सहकार्यम् यशोधनम्
स्थापना – १९४९
www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१९ – अंक ३ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून



आपल्या सर्वांच्या दैनंदिन जीवनावर तसेच व्यापार व उद्योगावर सरकारची ध्येयधोरणे प्रभाव टाकत असतात. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला देशात लोकसभेच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली होती, त्यामुळे अर्थातच राजकीय वातावरण तापले होते, सरकार कोणाचे येणार, आघाडीचे सरकार आले तर ते स्थिर असेल का, विद्यमान सरकार पुन्हा येणार का, असे अनेक प्रश्न सर्वांना पडले होते. त्यामुळे अनिश्चिततेचे वातावरण आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला होते; परंतु २३ मे २०१९ रोजी जनतेने बहुमताने विद्यमान सरकार पुन्हा निवडून दिले आणि अनिश्चिततेला पूर्णविराम दिला. विद्यमान सरकार– तेही पूर्वीपेक्षा जास्त जागा मिळवून निवडून येण्याचा देशाच्या लोकशाहीच्या इतिहासातील ही पहिलीच घटना असेल. त्यामुळे विद्यमान सरकारची आर्थिक धोरणे पुढे चालू राहण्याची खात्री झाली व नवीन सरकारने जाहीर केलेल्या अर्थसंकल्पातून त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. सरकारने सवंग लोकप्रिय घोषणा न करता, आर्थिक शिस्त कायम ठेवून, पायाभूत सुविधा उभारणीवर भर दिला आहे. ही एक स्वागतार्ह बाब आहे.

रिझर्व बँकेच्या पत धोरणामध्ये, पाव टक्का व्याजदर कपात केली आहे. रिझर्व बँकेने सलग तिसऱ्या वेळेला व्याजदर कपात केली आहे, त्यामुळे आत्तापर्यंत व्याजदरांमध्ये एकूण पाऊण टक्का व्याजदर कपात झाली आहे. सरकारने महसूल वाढवण्यावर भर देऊन आर्थिक तूट ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) ३.३% ठेवण्याचे लक्ष्य ठेवण्याचे निश्चित केले आहे. सरकारी कर्जाचे प्रमाण कमी होऊन त्याला स्वस्त व्याजदरांच्या कर्जाची जोड मिळणार असल्याने खाजगी गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण तयार होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अर्थातच खाजगी गुंतवणूक वाढून रोजगार निर्मिती होऊन देशाचे आर्थिक चक्र पुन्हा गती घेण्यासाठी सज्ज झाले आहे, असे मला वाटते.

हे सर्व होत असताना बँकिंग प्रणालीमधील अनुत्पादित कर्जांची वसुली ही एक आव्हानात्मक बाब अजून कायम आहे. नॉनबँकिंग फायनान्स कंपन्यांपुढील आर्थिक आव्हाने अजून अवघड होऊ लागली आहेत. मरगळ आलेल्या आर्थिक चक्रामुळे सर्वसामान्य माणसाची क्रयशक्ती क्षीण झाली आहे, त्यामुळे रोजगार निर्माण करण्याची क्षमता असलेले रिअल इस्टेट, वाहन उद्योग मंदीच्या गर्तेत आहेत. अनुत्पादित कर्जांच्या समस्येमुळे स्वस्त दराने कर्ज वितरण करण्यास बँकांना मर्यादा येत आहेत. परंतु सरकारची आर्थिक धोरणे व रिझर्व बँकेचे पतधोरण, कर्ज वसुलीसाठी सरकार करत असलेले संरचनात्मक बदल, ही मरगळ दूर करतील याची मला खात्री वाटते.

आपली बँक ही या व्यवस्थेचा एक घटक असल्यामुळे बँकही या आव्हानांना सामोरी जात आहे. आपल्या ग्राहकांमध्ये शेतीक्षेत्राशी संबधित उद्योग व व्यापारी आहेत, लघु उद्योजक आहेत. त्यामुळे आपल्या बँकेला या आव्हानांना अधिक खडतरपणे सामोरे जावे लागेल. बँकेने चालू आर्थिक वर्षात पूर्वीप्रमाणेच वसुली हा केंद्रबिंदू ठेवून चालू वर्षाची व्यावसायिक आखणी केली आहे.

नफा हा कोणत्याही व्यवसायाचा केंद्रबिंदू असतो आणि तो असलाच पाहिजे. सद्यस्थितीत बँकेची नफाक्षमता टिकवणे हे आव्हान आहे. या काळातही बँकेने सरासरी ३% व्याज दुरावा (स्प्रेड) कायम मिळवला आहे, तो अधिक वाढवण्याचे दृष्टीने बँकेने कासा ठेवी, थर्ड पार्टी योजनांची विक्री करून फी बेस उत्पन्न वाढवणे, जोखीम व्यवस्थापन करून गुणात्मक कर्जवाढ करणे याकडे बँक कटाक्षाने ➤ पान ३ वर...

## टिळक रोड शाखेमध्ये ISO मानांकन प्रदान कार्यक्रम संपन्न

### ISO मानांकन प्राप्त करणारी टिळक रोड बँकेची पहिली शाखा



बँकेच्या टिळक रोड शाखेमध्ये दि ९/५/२०१९ रोजी ISO मानांकन देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अशा प्रकारे ISO मानांकन प्राप्त करणारी टिळक रोड ही बँकेची पहिली शाखा असून या दिवशी शाखेस प्रत्यक्ष ISO मानांकन दाखला प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाखेचे मुख्य व्यवस्थापक श्री. महेश काळे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविकाने केली. शाखेने यशस्वीरीत्या ऑडिट पूर्ण करून सदर मानांकन मिळविले आहे. या संपूर्ण प्रक्रियेसाठी बँकेतील सर्व सेवक, बँकेचे ISO सल्लागार श्री. शशिकांत सातभाई व आयटी विभागातील सर्व सेवकांचे सहकार्य लाभलेले आहे.

त्यानंतर बँकेच्या आयटी विभागतील अधिकारी सौ. कल्याणी देशपांडे यांनी बँकेने सन २००५ पासून ISO सुरुवात केलेली असून बँकेचे डेटा सेंटर (२७००१) तसेच बँकेचे विविध ७ विभाग यापूर्वीच ISO झालेले असून आज आपली शाखा ISO झालेली असल्याचे सांगितले. शाखा ISO झालेली असल्याने शाखेला व बँकेच्या खातेदारांना होणारे फायदे या बाबत शाखेचे उपशाखा व्यवस्थापक श्री. अजित साने यांनी विवेचन केले.

यानंतर प्रत्यक्ष ISO मानांकन दाखला प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला. बँकेचे मा. अध्यक्ष श्री. संजय लेले, मा. उपाध्यक्ष श्री. अभय माटे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर यांचे हस्ते मानांकन दाखला देण्यात आला. मुख्य शाखा व्यवस्थापक व शाखेतील सहकारी यांनी तो स्वीकारला. त्यानंतर बँकेचे ISO सल्लागार श्री. शशिकांत सातभाई व शाखेतील काही सेवकांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.

नंतर बँकेचे खातेदार व ग्राहक पेठेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सूर्यकांत पाठक व एस. पी. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. शेठ सर यांनी बँकेकडून मिळणाऱ्या सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. बँकेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ➤ पान ३ वर...

# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

## कनिष्ठ अधिकारी दत्तात्रय आवार यांच्या मुलांना वैद्यकीय पदवी प्राप्त

CICD पुणे विभागातील कनिष्ठ अधिकारी श्री. दत्तात्रय अंबाजी आवार यांची दोन्ही मुले डॉक्टर झाली आहेत.

मुलगी डॉ. ऐश्वर्या दत्तात्रय आवार हिने आयुर्वेदातील पदवी प्राप्त केली असून मुलगा डॉ. सौरभ दत्तात्रय आवार हा डेंटिस्ट झाला आहे.



डॉ. ऐश्वर्या आवार



डॉ. सौरभ आवार

## ओतूर शाखेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

दि.२४.०६.२०१९ रोजी ओतूर शाखेमध्ये खाते असणाऱ्या शाळांमधील १० वीच्या गुणवंत विद्यार्थांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमास जवळजवळ ३० ते ४० विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जुन्नर तालुक्याचे आद्य नागरिक आमदार मा. श्री. शरददादा सोनावणे यांनी भूषविले व शाखेचे स्थानिक सल्लागार समिती सदस्य मा. श्री. एम.डी. घंगाळेसाहेब यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखेतील सेवक श्री. मारुती नवले यांनी केले. प्रस्तावना स्थानिक सल्लागार समिती सदस्य मा.श्री. बाळासाहेब डुंबरे यांनी केले. तसेच शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. अविनाश वावरे यांनी आभार मानले.

## खातेदार नागनाथअण्णा निडवदे यांचा उदगीर शाखेतर्फे सत्कार



उदगीर शाखेचे सन्माननीय खातेदार श्री. नागनाथअण्णा अण्णाराव निडवदे (जिल्हाध्यक्ष भा. ज. पा. लातूर जिल्हा) यांची गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) निवड झाल्याबद्दल उदगीर शाखेतर्फे साहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. विजय चौधरी, सेवक श्री. अमोल नागनाथ निडवदे व श्री. नानासाहेब हेळंबकर यांनी श्री. नागनाथअण्णांचा सत्कार केला.

## सेवक राजेंद्र शिदोरे यांना पंच श्रेणीमधील ‘अ’ श्रेणी जाहीर

चिंचवड स्टेशन शाखेतील सेवक श्री. राजेंद्र शिदोरे यांना जागतिक बुद्धीबळ संघटनेने आंतराष्ट्रीय पंच श्रेणीमधील ‘अ’ श्रेणी नुकतीच जाहीर केली असून, अशा प्रकारचे फक्त ७ पंच भारतामध्ये समाविष्ट आहेत.

त्याचप्रमाणे अखिल भारतीय संघटनेने त्यांना २५ मे २०१९ ते २८ मे २०१९ या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेसाठी प्रमुख पंच म्हणून नियुक्त केले आहे. या स्पर्धा पंजाबमध्ये होणार आहेत.

## चिंचवड शाखेचा नूतन वास्तूमध्ये प्रवेश



बँकेच्या चिंचवड स्टेशन शाखेचे दि. २०.०५.२०१९ रोजी ‘बहिरवाडे प्लाझा’ या इमारतीमधील पहिल्या मजल्यावर नूतन वास्तूमध्ये स्थलांतर झाले. नूतन वास्तूमध्ये श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित केली होती.

या शुभ प्रसंगी प्रमुख पाहुणे चिंचवड येथील प्रतिष्ठित खातेदार व हितचिंतक डॉ. दिलीप कामत आणि खासदार संसदरत्न श्री. श्रीरंग बारणे यांनी फीत कापून शाखेचे उद्घाटन केले. आपल्या अल्पशा भाषणामध्ये श्री. कामत यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात जनता बँकेसोबत केली असून बँकेस उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. खासदार श्री. बारणे यांनी समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारी सामाजिक जाणीव असणारी एक आदर्श बँक, असे गौरवोद्गार काढून आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष श्री. संजय लेले, शाखेचे संपर्क संचालक श्री. अमित शिंदे, संचालक श्री. बिरू खोमणे, महाव्यवस्थापक श्री. भालचंद्र परांजपे, सह-महाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यप, उप-महाव्यवस्थापक श्री. श्रीधर म्हसकर, साहाय्यक महाव्यवस्थापक श्री. विनय दुनाखे यांसह, शाखेचे प्रमुख खातेदार श्री. राजेंद्र पोफळे, श्री. अतुल शहा, श्री. मांडके, श्री. महिपाल, सौ. सविता शर्मा, श्री. मनोहर जांभेकर, स्थानिक सल्लागार श्री. दिलीप पारेख, श्री. हुकेरी, सौ. रेखाताई गावडे तसेच ग्राहक सेवा समितीच्या मान्यवरांसह अन्य ग्राहक, सभासद, खातेदार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. कामत आणि खासदार श्री. बारणे यांचेसह नवीन जागेचे मालक श्री. सागर बहिरवाडे, श्री. नारायणराव बहिरवाडे, श्री. रवींद्र नामदे तसेच जुन्या जागेचे मालक श्री. कुंडलिक गावडे यांचा आणि आर्किटेक्ट सौ. भगत यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# लातूर शाखेमध्ये शालान्त परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ



दिनांक १८ व १९ जून २०१९ रोजी बँकेचे मा. अध्यक्ष श्री. संजय लेले व मा. महाव्यवस्थापक श्री. भालचंद्र परांजपे यांनी लातूर शाखेस भेट दिली. त्या निमित्ताने शाखेचे खातेदार व सेवक यांच्या ज्या पाल्यांनी यंदा १०वी च्या परीक्षेत उत्तम यश संपादन केले, त्यांचा कौतुक समारंभ दिनांक १८ जून २०१९ रोजी लातूर शाखेतच पार पडला. या प्रसंगी या विद्यार्थ्यांचे शिक्षक श्री. कुलकर्णी सर, विद्यार्थांचे पालक, सेवक मोठ्या संखेने उपस्थित होते. या कार्यक्रमात मा. अध्यक्ष श्री. लेले, मा. महाव्यवस्थापक श्री. परांजपे यांचे हस्ते विद्यार्थांचा गुलाबपुष्प व पेन देऊन सत्कार करण्यात आला.

## अध्यक्षांचे लेखणीतून

➤ पान १ वरून...

लक्ष देत आहे. ढोबळपणे ही व्यूहरचना सर्व बँकांची असते, याचबरोबर Asset Liabilities च्या Maturity Patterns चा अभ्यास करून व्याज दुरावा वाढवण्यासाठी बँक प्रयत्नशील आहे. त्यामुळे बँकेचा आर्थिक पाया अधिक भक्कम होईल. ग्राहकांचे बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित व किफायतशीर व्हावेत, यासाठी बँक ग्राहकांसाठी तंत्रज्ञानावर आधारित सेवेची विविध चॅनल्स खुले करीत आहे. त्याचा लाभ सर्व ग्राहकांनी घ्यावा, अशी माझी आपणांस कळकळीची विनंती आहे. शाखास्तरावर चॅनल्स कशी वापरावीत याचे मार्गदर्शनही दिले जाते. किंवा आपली सोसायटी, कामाचे ठिकाण येथे ग्रुपला मार्गदर्शनही केले जाते, त्याचाही आपण लाभ घ्यावा. आपले स्नेही, हितचिंतक, नातेवाईक यांची खाती आपल्या बँकेत उघडावीत असे नम्र आवाहन मी या संवादातून आपणांस करत आहे.

बँकेचे व्यावसयिक व्यवस्थापन करून बँकिंग व्यवसायाच्या उत्कृष्टतेचे मापदंड साध्य करण्याचे आमचे लक्ष्य आहे. बँकेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक आणि सेवक यांच्या संघटित प्रयत्नांतून आपले हे लक्ष्य नजीकच्या काळातच भेदू, याची मला खात्री आहे. त्यासाठी आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

## टिळक रोड शाखेमध्ये ISO मानांकन प्रदान कार्यक्रम संपन्न

➤ पान १ वरून...

जयंत काकतकर यांनी ISO साठी बँकेत करावे लागणारे बदल, त्यामुळे बँकेच्या कामकाजात होणारे फायदे या सर्व गोष्टींचा मागोवा घेतला. तसेच टिळक रोड शाखेतील सर्व सेवकांचे केलेल्या कामाबद्दल विशेष कौतुक केले. यानंतर बँकेचे मा. उपाध्यक्ष श्री. अभय माटे यांनी मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास मान्यवर खातेदार मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेचे मा. श्री. गजेंद्र पवार, श्री. संजय कुलकर्णी, श्री. संदीप कोल्हटकर, श्री. शिरीष पाटील, श्री. सुशीलकुमार देशमुख, लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटीचे पुणे विभाग प्रमुख श्री. सुशील जाधव, ग्राहक पेठेचे श्री. सूर्यकांत पाठक, स.प. महाविद्यालयाचे श्री. वझे, श्री. शेठ सर, बँकेचे अन्य संचालक, शाखेचे स्थानिक सल्लागार सदस्य, मुख्य कचेरीतील वरिष्ठ अधिकारी व बँक असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मा. सुब्रमण्यम भट यांची तळेगाव स्टेशन शाखेस सदिच्छा भेट



दि. ०४/०७/२०१९ रोजी रा. स्व. संघ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य – कुटुंब प्रबोधन संयोजक मा. श्री सुब्रमण्यम भट यांनी आपल्या तळेगाव स्टेशन शाखेस सदिच्छा भेट दिली. या वेळी प. महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन सह संयोजक श्री. प्रकाशराव क्षीरसागर व सौ. कल्पनाताई क्षीरसागर तसेच पुणे जिल्हा संयोजक श्री. प्रदीप देसाई उपस्थित होते. त्यांनी बदलत्या काळातील कुटुंबव्यवस्था / समस्या इ. बाबत थोडक्यात माहिती दिली.

श्री. सुब्रमण्यम भट हे मूळचे केरळचे आहेत. त्यांनी आपल्या बँकेच्या कामाविषयी माहिती घेतली तसेच सर्व सेवकांची ओळख करून घेतली व बँकेच्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले. बँकेच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

# होम सेव्हिंग कलेक्शन प्रतिनिधी व्यवसाय आढावा बैठक वृत्तांत

दि. २४ एप्रिल २०१९ रोजी मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स टिळक रोड, पुणे येथे जे.एस.बी.एल.सोल्युशनमार्फत नियुक्त होम सेव्हिंग प्रतिनिधींचा मेळावा मार्केटिंग विभागामार्फत घेण्यात आला. या कार्यक्रमास सुमारे ८० प्रतिनिधी उपस्थित होते. मार्केटिंग विभागाचे उपमहाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर प्रभुणे यांनी प्रास्ताविक करून मागील बैठकीतील प्रतिनिधींनी मांडलेल्या अडचणी आणि त्यांवर विभागामार्फत केलेली कार्यवाही यांची संपूर्ण माहिती दिली. सदर कार्यक्रमात बँकेच्या डिजिटल मार्केटिंग या अनुषंगाने बँकेचे फेसबुक पेज आणि QRCODE बाबत श्री. प्रथमेश नार्विलकर यांनी माहिती दिली. या वेळी माहे मार्चमधील सर्वांत जास्त कलेक्शन केलेल्या पहिल्या ५ प्रतिनिधींचा पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. मा. सहमहाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यप यांनी होम सेव्हिंग प्रतिनिधी व्यवसायाचा आढावा घेऊन प्रतिनिधींना योजनेच्या नियमावलीत झालेले बदल आणि सदर बदलांबाबत प्रतिनिधींच्या असणाऱ्या शंका / अडचणींवर मार्गदशन केले. बँकेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना कलेक्शन व्यवसायाबरोबरच BC (Business Correspondent) आणि BBPS(Bharat Bill Payment System) या दोन्ही सुविधा प्रतिनिधींमार्फत बँकेच्या खातेदारांना देता येतील आणि प्रतिनिधींना उत्पन्न मिळू शकेल, असे सांगितले. बँकेचे मा. संचालक श्री. लक्ष्मण पवार यांनी सर्व उपस्थित प्रतिनिधींशी संवाद साधला. सर्व होम सेव्हिंग कलेक्शन प्रतिनिधींच्या वतीने श्री. जयेश संघवी यांनी बँकेच्या सर्व उपस्थित अधिकाऱ्यांचे आभार मानले. मार्केटिंग विभागातील सेवक श्री. राहुल कदम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास मार्केटिंग विभागातील अधिकारी सेवक श्री. संतोष बाम हेदेखील उपस्थित होते.



# १०वी व १२वी तील गुणवंत विद्यार्थी

## अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!



| क्र | सेवकाचे नाव | शाखा | पाल्याचे नाव | परीक्षा | मार्क्स % |
|---|---|---|---|---|---|
| १ | दत्ताराम गंगाराम सोलकर | माखजन | कु. मृण्मयी द. सालेकर | १० वी | ९८.६० |
| २ | विलास राम चिल्लाळ | पिंपरी | कु. वेदांती वि. चिल्लाळ | १० वी | ९६.२० |
| ३ | सुनील भालचंद्र उत्तुरकर | गडहिंग्लज | कु. प्रथमेश सु. उत्तुरकर | १० वी | ९५.२० |
| ४ | मनीष शंकर पार्टे | गोरेगाव | कु. श्रावणी म. पार्टे | १० वी | ९४.८ |
| ५ | प्रसाद अनंत शानभाग | भोर | कु. प्रीती प्र. शानभाग | १० वी | ९१.६० |
| ६ | मकरंद माधव जोशी | स्थावर विभाग | कु. स्वराज मकरंद जोशी | १० वी | ९०.४० |
| ७ | महेश चंद्रकांत काळे | टिळक रोड | कु. मानसी एम. काळे | १२ वी | ८९.०० |
| ८ | प्रविण माधव खोपडे | IB CELL | कु. संज्योत प्र. खोपडे | १२ वी | ८९.०० |
| ९ | अनिरुद्ध श्रीधर पळशीकर | नऱ्हे-आंबेगाव | कु. आर्या अ. पळशीकर | १० वी | ८९.०० |
| १० | अभिजित दत्तात्रय मकाशिर | टिळक रोड | कु. आदिती अ. मकाशिर | १० वी | ८८.०० |
| ११ | सुहास रामचंद्र दामले | विलेपार्ले | कु. अथर्व सु. दामले | १० वी | ८६.०० |
| १२ | अरविंद अच्युत फडके | शि. नगर-रत्नागिरी | कु. ऋषिता अ फडके | १० वी | ८४.४० |
| १३ | प्रसाद मो. उर्फ भाऊ कार्ले | देवरूख | कु. वेदांत प्र. कार्ले | १२ वी | ८४.१५ |
| १४ | सुनिल वामनसिंग परदेशी | मार्केटयार्ड | कु. कार्तिकी सु. परदेशी | १२ वी | ८४.०० |
| १५ | नितीन शरणप्पा भंडारी | एनएसडीएल | कु. प्रथमेश नि. भंडारी | १२ वी | ८३.५० |
| १६ | शैलेश चंद्रकांत घोसाळकर | गोरेगाव | कु. तन्मय शै. घोसाळकर | १२ वी | ८३.०० |
| १७ | अभय अनंतराव ढमाले | मार्केटयार्ड | कु. ओम अ. ढमाले | १० वी | ८३.०० |
| १८ | संजय अरविंद देशपांडे | कस्टमर केअर | कु. शार्दूल सं. देशपांडे | १० वी | ८२.६० |
| १९ | महेश पुंडलिक पोळ | नियोजन विभाग | कु. विवेक म. पोळ | १० वी | ८१.६० |
| २० | प्रकाश श्रीकांत केळकर | शि. नगर-रत्नागिरी | कु.शिवानी प्र.केळकर | १२ वी | ८०.०० |
| २१ | सुनिल वामनसिंग परदेशी | मार्केटयार्ड | कु. संस्कृती सु. परदेशी | १० वी | ७७.०० |
| २२ | आशा रवींद्र सहाणे | जुन्नर | कु. अभिजित र. सहाणे | १० वी | ७७.०० |
| २३ | अर्जुन दरीबा वडतिले | नऱ्हे-आंबेगाव | कु. भक्ती अ. वडतिले | १२ वी | ७६.०० |
| २४ | संभाजी निवृत्ती कातुर्डे | कात्रज | कु. करण सं. कातुर्डे | १० वी | ७५.०० |
| २५ | राजाराम अनंतराव सूर्यवंशी | एफ. सी. रोड | कु. अथर्व रा. सूर्यवंशी | १२ वी | ७४.०० |
| २६ | गजानन रत्नाकर कुलकर्णी | प्रशासन विभाग | कु. शांभवी ग. कुलकर्णी | १२ वी | ७४.०० |
| २७ | चंद्रकांत देवजी मेणे | कडवई | कु. देवेश चं. मेणे | १२ वी | ६०.०० |
| २८ | सुनील वसंत मांडवकर | शि. नगर रत्नागिरी | कु. सानिका सु. मांडवकर | १० वी | ५८.८० |
| २९ | चंद्रकांत देवजी मेणे | कडवई | कु. नितेश चं. मेणे | १० वी | ४६.०० |



**कु. मृण्मयी सोलकर**
९८.६०% (१० वी)



**कु. वेदांती वि. चिल्लाळ**
९६.२० (१० वी)



**कु. प्रथमेश उत्तुरकर**
९५.२०% (१० वी)



**कु. श्रावणी म. पार्टे**
९४.८% (१० वी)



**कु. शांभवी कुलकर्णी**
९२.४८% (CEET)



**कु. प्रीती प्र. शानभाग**
९१.६०% (१० वी)



**कु. स्वराज जोशी**
९०.४०% (१० वी)



## माखजन इंग्लिश स्कूल व करजुवे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे शालान्त परीक्षेमध्ये सुयश

माखजन येथील माखजन इंग्लिश स्कूल व करजुवे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी १० वीच्या परीक्षेमध्ये उत्कृष्ट गुण मिळवून शाळेचे नाव उंचावले. यश किशोर तांबट (९२%), क्षितिज दीपक शिगवण (८८.६०%) व श्वेता चंद्रकांत सुर्वे (८७.४०%) तसेच करजुवे हायस्कूलच्या स्नेहा सुनील गोवळकर (९०%), तर मंदार अर्जुन वेले (८६.४०%), प्रतेश प्रकाश धनावडे (८५.४०%) या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांचे जनता बँक परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

# आनंदाची पाठशाळा : ‘ओळखा स्वत:ला, घडवा स्वत:ला’

थोड्याच वेळात सगळीच मुले खो खो हसायला लागली. हसण्याचे कारण मला माहीत होते. एक दोन अपवाद वगळता कुणाचेच चित्र हत्तीसारखे दिसत नव्हते. हत्तीचे आकारमान म्हणजे त्याची सोंड, शेपटी, कान, दात, पाठ आणि पोट या सर्व गोष्टी बहुतेकांनी वेगवेगळ्या आकारमानांत काढल्या होत्या. चित्रे इतकी वेगळी होती की चित्र पाहून हसूच येत होते. एक दोन मुलांनी काढलेली चित्रे मात्र हत्तीशी खूप साधर्म्य दर्शविणारी होती. सर्वजण उत्सुक होते ते या छोट्या गोष्टीमधून काय माहिती मिळणार होती ते ऐकायला.

“मित्रांनो, हत्ती अगदी रोज पाहण्यात नसला तरी आपण लहान असल्यापासून हत्तीचे चित्र पाहत आहात. हत्तीची सोंड, पाठ, पोट, पाय, शेपूट आणि दात या सर्वांची एक प्रमाणबद्धता आहे आणि ती योग्य असेल तरच तुम्ही काढलेले चित्र हत्तीसारखे दिसेल, अन्यथा नाही. ज्यांना असे चित्र काढणे जमले नाही त्यांना त्रिमितीय विचार करण्याची क्षमता, तसेच फिगरल मेमरी फारशी नाही असे म्हणावे लागेल. आर्किटेक्ट्स, डिझाइनर, आर्टिस्ट अशांना हे कौशल्य उत्तम असते. ही कौशल्ये येण्यासाठी मुळात चित्र काढणे, डिझाइन काढणे, याची आवड असावी लागते आणि ही आवड क्षमतेमध्ये बदलण्यासाठी प्रशिक्षण, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि सततच्या सरावाची गरज आहे.

आता आणखी एक गोष्ट करून पाहू

दोन समकेंद्रीय वर्तुळे काढा. आता या आकृतीशी साधर्म्य असणाऱ्या ज्या गोष्टी तुमच्या पाहण्यात आहेत त्यांची चित्रे काढा.”

“म्हणजे नक्की काय करायचे? एखादे उदाहरण सांगा म्हणजे आमच्या लक्षात येईल.” नेहा म्हणाली.

माझ्या हातात गोलाकार घड्याळ असते ते काढून मी हातात घेतले आणि

## ओळख स्वत:ची




**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’ या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.**

म्हणालो, “ही वस्तू ओळखीची आहे?” सर्व “हो” म्हणाले. “या घड्याळ्याच्या डायलचा आकार कसा आहे?” मी म्हणालो

“गोल.”

“आणि बाहेरील स्टीलच्या केसचा आकार काय आहे?”

“गोल.”

“दोन्ही समकेंद्रीय आहेत?”

“हो.”

“आणखी एक उदाहरण देतो.” असे म्हणून मी शेजारी स्टीलचा पाण्याचा तांब्या होता तो सर्वांना दाखवला. “मित्रानो या तांब्याचे तोंड आणि तळ दोन्ही गोलाकार आहेत आणि ते समकेंद्रीय आहेत, बरोबर?” “हो” सर्व जण.

“आता कळले का तुम्ही काय करायचं आहे?”

“हो.”

“तर मग ५ मिनिटांत जेवढी उदाहरणे तुम्हाला लक्षात येतील त्यांची चित्रे तुम्ही वहीत काढायची आहेत. कोणत्याही चित्राच्या खाली ते कशाचे चित्र आहे हे लिहायचे नाही. चित्र पाहताच ते कशाचे चित्र आहे हे कळले पाहिजे, ओ के?”

“हो.”

“तर मग करा सुरुवात.” ५ मिनिटांचा वेळ सर्वांना दिला होता. मुलं, मुली चित्र काढण्यात गर्क होती. ५ मिनिटांची त्यांना काम थांबवण्यास सांगितले. आणि विचारले. “दहापेक्षा जास्त गोष्टी कोणी काढल्या आहेत?”

तीन जणांचे हात वर झाले.

“पंधरापेक्षा जास्त?” असे मी विचारल्यावर एक हात वर गेला. या तिन्ही जणांच्या वह्या मागून घेतल्या. काही गोष्टींची पुनरावृत्ती झाल्यासारखी वाटत होती, त्या बाद करूनही बरीच कल्पकता दिसत होती. मग सर्व मुलांना त्या वह्या बघण्यास सांगितले.

पुढची दहा मिनिटे मग एकच गोंधळ सुरू होता आणि मधूनच “अरे हे तर अगदी सोपे होते. मला कसे सुचले नाही.” अशा कॉमेंट्स ऐकू येत होत्या. मी सर्वांना बसायला सांगितले. सर्वांच्या डोळ्यांत उत्सुकता दिसत होती. आपण नक्की यातून काय शिकलो ते जाणून घेण्याची.

“मित्रांनो, ही तर अगदी साधी टेस्ट मी तुम्हाला दिली होती आणि ज्यांच्या वह्या मी तुम्हाला बघायला दिल्या त्या सर्वांचे मला कौतुक करायचे आहे. कारण त्या सर्वांना उत्तम क्रिएटिव्हिटी आहे. त्यांना चांगली कल्पनाशक्ती आहे. आणि ती पुढे वाढवता येईल. क्रिएटिव्हिटी ही प्रत्येकात असते. फरक एवढाच की काहींना आपल्यात क्रिएटिव्हिटी आहे हे माहीत असते तर अनेक जण त्या बाबत अनभिज्ञ असतात. क्रिएटिव्हिटी फक्त कलात्मक गोष्टीमध्ये किंवा साहित्यिक गोष्टीमध्ये असते असे नाही; तर आपण करत असलेल्या सर्व गोष्टींत ती आपल्याला साधता येते. हा एक आपल्या व्यक्तिमत्वाचा महत्त्वाचा पैलू आहे. क्रिएटिव्हिटी ही जीवनावश्यक कौशल्यांमधील एक महत्त्वाची वैयक्तिक गुणवत्ता आहे.”

“सर, ‘आपल्या क्षमता किंवा कल ओळखा’ असे तुम्ही सांगितलेत. समजा, मला माझी एखादी क्षमता किंवा एखादा कल किती प्रगल्भ आहे हे शोधायचे असेल तर ते मला कशा रीतीने ओळखता येईल?” मनोज म्हणाला.

“मनोज, यासाठी क्षमता किंवा कल चाचण्यांचा वापर करावा लागेल. या चाचण्या कशा रीतीने निर्माण करतात हे मी तुम्हांला सांगितले आहेच; पण मी काही प्रश्न तुला विचारतो, त्यातून तुझी शंका दूर होईल.”

समज तुझे इंग्लिश भाषेचे कौशल्य आणि संभाषण कौशल्य कसे आहे हे तुला शोधायचे आहे. यासाठी मी तुला एक प्रश्नावली देतो. प्रश्नावली मुद्दाम इंग्लिशमध्येच आहे. कारण त्या भाषेतील तुझे कौशल्य कसे आहे? कितपत प्रगत आहे, हे आपण या साध्या प्रश्नांच्या उत्तरांतून होईल.

How good are you in English language and communication? Read each of the following statements and tick it if you agree with it and cross it if you do not agree with it.

1. I Can read well.
2. I can write well.
3. I can Speak well.
4. I can understand the meaning of content in single reading.
5. I can easily communicate with my friend.
6. I can easily communicate with strangers.
7. I can easily communicate with my authorities and elders.
8. I can easily address a gathering of people.
9. I can easily address a meeting.
10. I can deliver a talk to a learned audience.
11. I am good at creative writing.

यातील बहुतेक प्रश्नांना तुझे उत्तर होकारात्मक असेल तर तुझे इंग्रजी भाषेचे कौशल्य चांगले आहे असे मानता येईल.

**क्रमशः**

# स्वर्गीय भय्याराव व लीलाताई गौतम पुरस्कार व विविध सामाजिक संस्थांना आर्थिक देणगी



कै. वसंत दत्तात्रय उर्फ भय्याराव गौतम खाजगी कौटुंबिक विश्वस्त निधीचे व्यवस्थापन एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाकडे असून बँक या निधीची कार्यकारी विश्वस्त म्हणून काम पाहत आहे. सदर निधीद्वारा दरवर्षी एकूण ११ विविध सामाजिक संस्थांना आर्थिक देणगी दिली जाते; तर आयुर्वेद क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थेस 'स्व. भय्याराव व लीलाताई गौतम पुरस्कार' या नावाने पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सदर कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २१.०६.२०१९ रोजी वि.का. राजवाडे सभागृह, सदाशिव पेठ, पुणे येथे संपन्न झाला.

कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून श्री. सुहासराव हिरेमठ, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, तर प्रमुख अतिथी म्हणून आपल्या बँकेचे मा. अध्यक्ष श्री. संजयराव लेले उपस्थित होते. व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक श्री. श्रीधरपंत फडके, विश्वस्त निधीचे विश्वस्त श्री. अरविंद ठाकूर आणि श्री. यशवंत साबळे तसेच बँकेचे मा.उपाध्यक्ष श्री. अभय माटे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर उपस्थित होते. कार्यक्रमास बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री. श्रीधर म्हस्कर, सर्व सन्माननीय पुरस्कारार्थी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व विश्वस्त निधीचा परिचय निधीचे विश्वस्त श्री. यशवंत साबळे यांनी करून दिला. कै. वसंत उर्फ भय्याराव गौतम हे संघाचे प्रचारक होते. त्यांचे मूळ नाव दावलभक्त असे होते. त्यांचे गोत्र गौतम असल्यामुळे प.पू.गुरुजींनी गौतम हे नाव रूढ केले. प.पू.डॉ. हेडगेवार यांच्याशी संपर्कात आल्याने समाजासाठी आपले जीवन आहे हे ध्येय त्यांचे संघ संस्कारामुळेच पक्के झाले. कै. गौतम यांनी योग, सूर्यनमस्कार, आयुर्वेद याच्या प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. कै. वसंत गौतम आणि कै. लीलाताई गौतम यांचे इच्छापत्र बँकेकडे व्यवस्थापनासाठी होते. त्यानुसार पुण्यातील नारायण पेठ, दत्तधाम अपार्टमेंट येथील राहते घर राष्ट्रीय स्वयंसेवक संघास सुपूर्त करण्यात आले. व्यक्तिगत मिळकतीतील ठेवींवरील व्याजातून दरवर्षी विश्वस्त पत्रानुसार विविध ११ सामाजिक संस्थांना आर्थिक देणगी आणि आयुर्वेदावर काम करणाऱ्या संस्थेस आर्थिक देणगी व स्वर्गीय भय्याराव व लीलाताई गौतम पुरस्कार अदा करण्यात येतो.

या प्रसंगी प्रमुख वक्ते श्री. सुहासराव हिरेमठ म्हणाले, कै. भय्याराव गौतम यांच्याशी माझा संपर्क माझ्या लहानपणापासून आहे. अत्यंत कडवट, परिश्रमी आणि कटिबद्धता जी आपल्या कार्यास असावी असे उत्तम उदाहरण म्हणजे भय्याराव! कोणत्याही कुटुंबाच्या, समाजाच्या, देशाच्या भल्याकरिता, विश्वाच्या कल्याणासाठी जो अवश्य गुण लागतो तो समर्पणाचा असतो. त्यांनी त्यांच्या पश्चात आपल्याकडून समाजाचे देणे आहे म्हणून हा विश्वस्त निधी निर्माण केला आहे. एकूण ११ विविध सामाजिक संस्थांना रक्कम रु. १०,०००/- इतकी आर्थिक देणगी प्रदान करण्यात आली. तर २०१९ साठीचा 'स्वर्गीय भय्याराव व लीलाताई गौतम पुरस्कार' 'वैद्यराज व्हिजन' यांना प्रदान करण्यात आला. रक्कम रु. २१०००/- चा देणगी धनादेश आणि सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. आर्थिक देणगी व पुरस्कार व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन विश्वस्त निधीचे विश्वस्त श्री. अरविंद ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागाचे कनिष्ठ अधिकारी श्री. किशोर चव्हाण यांनी केले. एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागामार्फत लेखनिक कु.अक्षता पुजारी, श्री. श्याम जगदाळे, श्री. अमोल कदम हे उपस्थित होते.

## शाखा वर्धापन दिनाच्या शुभेच्छा!

**(माहे जुलै ते सप्टेंबर)**

| अ.क्र. | शाखा | दिनांक |
|---|---|---|
| १. | चिपळूण | ४/०७ |
| २. | गडहिंग्लज | ४/०७ |
| ३. | जवाहरनगर | ४/०७ |
| ४. | कराड | ४/०७ |
| ५. | इचलकरंजी | ४/०७ |
| ६. | सांगली | ४/०७ |
| ७. | जयसिंगपूर | ४/०७ |
| ८. | मोशी | २७/०७ |
| ९. | धनकवडी | २७/०७ |
| १०. | नऱ्हे आंबेगाव | १४/०८ |
| ११. | पेण | १९/०८ |
| १२. | जालना रोड | १९/०८ |
| १३. | बोरिवली | २५/०८ |
| १४. | घाटकोपर | २५/०८ |
| १५. | चंदननगर | २६/०८ |
| १६. | उदगीर | १४/०९ |
| १७. | सहकारनगर | २७/०९ |

## रत्नागिरी शाखेत ग्राहक मेळावा संपन्न

रत्नागिरी अर्बन बँकेचे आपल्या जनता सह. बँक लि. पुणेमध्ये झालेल्या विलीनीकरणास ४१ वर्षे पूर्ण झाल्याने शाखेने ग्राहक मेळाव्याचे आयोजन २३/०५/२०१९ रोजी केले होते, तसेच शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. संजीव आंबेकर, सहा. शाखा व्यवस्थापक. श्री. मंदार सरपोतदार, लेखनिक श्री. अमोघ लिमये आणि लेखनिक श्री. श्रीराम केळकर यांनी सामाजिक बांधिलकी जोपासावी या उद्देशाने उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

## कात्रज शाखेमध्ये 'डॉक्टर्स डे'

डॉक्टर्स डे निमित्ताने दि.२९.०६.२०१९ रोजी कात्रज शाखेतर्फे डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास ४७ डॉक्टर्स उपस्थित होते.

कार्यक्रमास बँकेचे मा. अध्यक्ष श्री. संजय लेले, मा. उपाध्यक्ष श्री. अभय माटे, संचालक श्री. रामदास वि. शिंदे, बद्रीमूर्ती सर, सह महाव्यवस्थापक श्री. सुनिल कामत, साहाय्यक महाव्यवस्थापक श्री. विनय दुनाखे आणि पुणे डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष मा.डॉ. श्री. संतोष पवार, सचिव डॉ. संतोष कवितके, उपाध्यक्ष राज लवंगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यामध्ये डॉ. मिलिंद भोई, डॉ. अभिजीत सोनावणे, डॉ. कुणाल कामठे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# देवरुख शाखेने डॉक्टर्स डे व चार्टर्ड अकौंटंट डे केला साजरा

डॉक्टर्स डे निमित्त देवरुखमधील सर्व डॉक्टर्सना तसेच शाखेत आलेल्या डॉक्टर्सना सन्मानपत्र देऊन शुभेच्छा दिल्या व सीए डे दिनानिमित्तदेखील शाखेने शाखा परिसरातील सीए ना भेटी देऊन व शाखेमध्ये आलेल्या सीए ना शुभेच्छा दिल्या.





डॉक्टर्स डे निमित्त डॉ. श्री सौरभ घाणेकर यांना मुख्य कचेरीकडून आलेले सन्मानपत्र प्रदान करताना शाखा व्यवस्थापक श्री. दातार व अधिकारी तसेच चार्टर्ड अकौंटन्ट डे निमित्त सीए श्री. कौस्तुभ भाट्ये व कु. नलावडे यांना शुभेच्छा देताना शाखाव्यवस्थापक श्री. दातार व अधिकारी.

## माहे एप्रिल ते जून २०१९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| नाव | हुद्दा | शाखा/विभाग |
|---|---|---|
| प्रताप ना. बारवे | चीफ ऑफिसर | प्रशासन |
| सतीश व.पाटील | चीफ ऑफिसर | कर्ज विभाग मु.क. |
| नितीन श्री. तारे | वरिष्ठ अधिकारी | सहकारनगर |
| माधव प्र. लयाळ | कनिष्ठ अधिकारी | बाजीराव रोड |
| प्रकाश बा. जाधव | कनिष्ठ अधिकारी | सेवा विभाग |
| अरविंद वि. गोडबोले | कनिष्ठ अधिकारी | कर्ज मॉनिटरिंग |
| अशोक श. देशमुख | लेखनिक | सूस-पाषाण |
| मिलींद प्र. मालकर | लेखनिक | तळेगाव दाभाडे |
| मोहन व. रत्नपारखी | लेखनिक | कर्वेनगर |
| शिरीष य. जोशी | लेखनिक | कर्वेनगर |
| सुरेंद्र भ. भंडारी | लेखनिक | डी.आर.साइट |
| प्रकाश शा. कारभाळ | लेखनिक | बोरिवली |
| विलास रा. कुलकर्णी | लेखनिक | बाजीराव रोड |
| अनिल बा. राउत | लेखनिक | फर्ग्युसन रोड |
| सुहास दि. प्रभुणे | लेखनिक | ठाणे, घोडबंदर |
| बाबासाहेब स. झंजाड | लेखनिक | दादर |
| नामदेव धों. गायकवाड | शिपाई | श. ना. पेठ |
| अधिक शां. सोनावणे | शिपाई | हिशोब |
| मधुकर वि. काथार | शिपाई | औरंगाबाद |
| निवृत्ती र. कुंभार | शिपाई | विलेपार्ले |

# देवरुख शाखा स्वमालकीच्या वास्तूत स्थलांतर कार्यक्रम वृत्तांत



देवरुख शाखेचा दि १३/०५/२०१९ रोजी जागुष्टे कॉम्प्लेक्स एसबीआय रोड येथे स्वमालकीच्या वास्तूत स्थलांतर कार्यक्रम झाला. श्री. सदानंद भागवत यांच्या शुभ हस्ते नवीन शाखेचे फीत कापून व श्री. मनोहरशेठ भिडे यांचे शुभ हस्ते ATMचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. दीप प्रज्वलनाने हा कार्यक्रम सुरू झाला. सर्व उपस्थितांचे शाखा व्यवस्थापक श्री. श्रीराम दातार यांनी स्वागत केले. बँकेचे महाव्यवस्थापक श्री. परांजपे यांनी प्रास्ताविक केले.

बँकेचे मा. संचालक श्री. सुधीर पंडित यांनी आपल्या मनोगतात, देवरुखमध्ये ४० वर्षे ही बँक कार्यरत आहे. बँक ग्राहकांना सर्व सेवा देत असून सर्व ग्राहकांनी बँकेच्या सर्व सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या वेळी देवरुखच्या प्रथम नागरिक व नगराध्यक्षा सौ. मृणाल शेट्ये तसेच जागामालक श्री. वैजनाथ जागुष्टे व पूर्वीचे जागामालक श्री. बापू शेलार यांचा सत्कार केला. कार्यक्रमास बँकेचे सहमहाव्यवस्थापक श्री. यशवंत ढवळीकर, सहा. महाव्यवस्थापक श्री. दुनाखे आदी उपस्थित होते. श्री. संदीप गानू यांनी उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

# एनपीसीआयद्वारा आयोजित 'भारत बिल पे बाजीगर कॉन्टेस्ट'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

एनपीसीआयने जनता बँकेसाठी दि. १ फेब्रुवारी २०१९ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीकरिता 'भारत बिल पे बाजीगर कॉन्टेस्ट' घोषित केलेली होती. सदर कॉन्टेस्टकरिता सर्व शाखांमधून प्रत्येक श्रेणीमध्ये एक विजेता तसेच सर्व शाखांतील सेवकांमधून प्रत्येक श्रेणीमध्ये एक विजेता घोषित करणार असल्याचे कळविण्यात आले होते.

या दोन्ही कॉन्टेस्टचा पारितोषिक वितरण समारंभ ६ मे २०१९ रोजी बँकेच्या बाजीराव रोड येथील संचालक मंडळ सभागृहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात एनपीसीआयचे अधिकारी श्री. आशिष सक्सेना आणि श्री. सुबेंदू झा ह्यांच्या स्वागताने झाली. त्यानंतर बँकेचे उप महाव्यवस्थापक श्री. यशवंत ढवळीकर यांनी उपस्थितांना एनपीसीआय आणि BBPS बद्दल सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर बँकेचे मा. संचालक श्री. अभय माटे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर आणि एनपीसीआयचे अधिकारी यांच्या हस्ते सोनाली विनायक ठीक, साखरपा शाखा, अजय भरत सुतार इचलकरंजी विस्तारित कक्ष, अनंत दादुगावडे पावस शाखा या विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देण्यात आले. पावस शाखेचे व्यवस्थापक श्री. गानू यांनी कॉन्टेस्टच्या प्रतिसादाबद्दल सविस्तर सांगितले. एनपीसीआयचे अधिकारी श्री. आशिष सक्सेना यांनी त्यांच्या भाषणात बँकेचे कौतुक केले.

# अभिनंदन !!! बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी.....

| नाव | परीक्षेचा प्रकार | शाखा/विभाग | हुद्दा | वर्ष |
|---|---|---|---|---|
| कु. तन्वी आनंद पाध्ये | सीएआयआयबी | क्रेडिट सेल मुंबई | कनिष्ठ अधिकारी | जून २०१९ |
| कु. सायली वसंत साठे | जेएआयआयबी | गिरगाव | लेखनिक | मे २०१९ |
| श्री. प्रथमेश महावीर सावंत | जेएआयआयबी | कांदिवली | लेखनिक | मे २०१९ |
| श्री. मंदार दत्तात्रय सरपोतदार | जेएआयआयबी | रत्नागिरी | कनिष्ठ अधिकारी | मे २०१९ |
| श्री. उदय वसंत कुलकर्णी | प्रिव्हेन्शन ऑफ सायबर क्राइम अँड फ्रॉड मॅनेजमेंट | गांधीनगर | वरिष्ठ अधिकारी | जुलै २०१९ |
| श्री. उदय वसंत कुलकर्णी | आय.टी. सिक्युरिटी | गांधीनगर | वरिष्ठ अधिकारी | जुलै २०१९ |
| श्री. अभय दत्तात्रय पाठक | ए.एम.एल. | टिळक रोड | वरिष्ठ अधिकारी | २७/०४/२०१९ |
| श्री. धनंजय श्रीरंग वरंडे | ए.एम.एल. | कांदिवली | प्रो. कनिष्ठ अधिकारी | २२/०६/२०१९ |
| श्री. मिलिंद रघुनाथ हसुरे | सर्टिफिकेट इन आयटी सिक्युरिटी | गडहिंग्लज | लेखनिक | २०/०५/२०१९ |
| सौ. शर्वरी अमित गावडे | एनआयएसएम | एनएसडीएल | लेखनिक | ७/०४/२०१९ |
| सौ. चैत्राली योगेश जाधव | एनआयएसएम | भवानी पेठ | लेखनिक | ५/०५/२०१९ |
| कु. स्नेहल शरद दातार | एनआयएसएम | कर्वे रोड | लेखनिक | १५/०५/२०१९ |
| श्री. नेहाल नारायण बोराडे | एनआयएसएम | टिळकरोड | लेखनिक | मार्च २०१९ |
| श्री. मोहन चंद्रकांत पोतदार | एस. पी. कंपोझिट्स | इचलकरंजी | लेखनिक | १९/०४/२०१९ |
| श्री. संदेश दत्तात्रय कान्हेरे | एस. पी. कंपोझिट्स | कडवई | लेखनिक | १५/०४/२०१९ |
| सौ. सुप्रिया शंकर जोशी | एस. पी. कंपोझिट्स | साखरपा | लेखनिक | २०/०४/२०१९ |
| सौ. विशाखा शुक्लेंदू पटवर्धन | एस. पी. कंपोझिट्स | जुन्नर | लेखनिक | १५/०४/२०१९ |
| श्री. नानासाहेब संजीव हेळंबकर | एस. पी. कंपोझिट्स | उदगीर | लेखनिक | १३/०४/२०१९ |
| श्री. कौस्तुभ भरत जोशी | एस. पी. कंपोझिट्स | रत्नागिरी | लेखनिक | १३/०४/२०१९ |
| श्री. स्नेहराज मधुकर साळुंके | एस. पी. कंपोझिट्स | पावस | लेखनिक | १३/०५/२०१९ |
| सौ. अल्पिता निलेश क्षीरसागर | एस. पी. कंपोझिट्स | चंदननगर | कनिष्ठ अधिकारी | २९/०४/२०१९ |
| श्री. रोहन राजेंद्र आठल्ये | एस. पी. कंपोझिट्स | कडबई | कनिष्ठ अधिकारी | २६/०४/२०१९ |
| श्री. सौरभ सुरेश कानडे | एस. पी. कंपोझिट्स | पावस | लेखनिक | २६/०६/२०१९ |
| श्री. अमोल राजाराम कुलकर्णी | एस. पी. कंपोझिट्स | जवाहरनगर | लेखनिक | १९/०६/२०१९ |
| श्री. अर्चीत संजय सहस्रबुद्धे | एस. पी. कंपोझिट्स | गांधीनगर | लेखनिक | ०९/०७/२०१९ |
| कु. चैत्राली रघुनाथ नाईक | एस. पी. कंपोझिट्स | गांधीनगर | लेखनिक | ०९/०७/२०१९ |
| श्री. ऋषिकेश शेषराव देशपांडे | एस. पी. कंपोझिट्स | लातूर | लेखनिक | २१/०६/२०१९ |
| श्री. ऋषिकेश राजेंद्र जोशी | एस. पी. कंपोझिट्स | गडहिंग्लज | लेखनिक | १५/०७/२०१९ |

**वाचकांना नम्र आवाहन :** शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग इ. विषयी असणारी उपयुक्त बातमी, विशेष उपलब्धी, माहिती, गौरव, पुरस्कार किंवा लेख संबंधित छायाचित्रांसह जरूर पाठवावेत. यासाठीचा मजकूर A4 साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून बंद पाकिटातून पुढील पत्त्यावर पाठवावा. यामधील वेचक वेधक मजकूर गरुड झेप मध्ये प्रकाशित केला जाईल. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे. मो. क्र. : ९९६०१२३३३१**
**गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✲ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

**गरुड झेप**

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क साधावा. **दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८ ००३४८.**

१३/०८/२०१९